हुरडा पार्टी
शालेय सहल व हुरडा पार्टी
आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.
मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १३३ वा | मंगळवार, दि. २४ डिसेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# बेट्या, याच आंबेडकरांनी आम्हाला माणसात आणलं तुझ्या देवानं नव्हे !


दत्तकुमार खंडागळे
मो. 9561551006

सत्ता डोक्यात गेली की माज येतो असे म्हणतात. ज्याची कुवत नसते असे लोक तर सत्ता हाती आली की खुपच मस्तावतात. माकडानं दारू पिली की काय होतं? हे वेगळं सांगायला नको. सध्या देशात शहा-मोदींची तिच स्थिती आहे. बेलगाम सत्ता हातात आहे. विरोध करणारे सगळेच मोडून काढलेत. सगळ्या पध्दतीची शस्त्रे वापरत लोकांच्यात भय निर्माण केले आहे. हाताशी असलेल्या सत्तेच्या जोरावर लोकांचा आवाज दाबला जात आहे. सगळ्या सरकारी संस्थांना हातचं बाहूलं बनवलं आहे. या संस्थांच्या व हाती असलेल्या सत्तेच्या जोरावर हे दोघे सर्वांनाच धाकात ठेवू पाहत आहेत. जे विकत मिळत आहेत त्यांना विकत घेतलं जात आहे. जे घाबरत आहेत त्यांना भिती दाखवून गप्प बसवलं जात आहे. जे घाबरत नाहीत, विकत मिळत नाहीत त्यांचा जस्टीस लोया केला जातो आहे. त्यांना बदनाम केले जात आहे, तुरूंगात टाकले जात आहे. अवघ्या देशात आपलीच निरंकूश सत्ता असल्याचा या लोकांना माज चढला आहे. या माजातूनच परवा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आंबेडकरांचा अवमान करणारे वक्तव्य केले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्याबद्दल अमित शहा यांना प्रेम असूच शकत नाही आणि असायचं कारणही नाही. ते बाबासाहेबांचा तिरस्कारच करणार यात नवल ते काय ? परवा संसदेत बोलताना त्यांनी, "काही लोक सतत "आंबेडकर आंबेडकर करत असतात. ही फँशन झाली आहे, जर इतक्यावेळा त्यांनी देवाचे नाव घेतले तर देव प्रसन्न होईल आणि सातवेळा स्वर्गात जागा मिळेल !" असं म्हंटल. खरंतर अमित शहांना आंबेडकरांचे कुणी सतत नाव घेतलेले नाही आवडणार. कारण ते ज्या मातृसंस्थेच्या पोटातून आलेत तिथ बाबासाहेबांचा द्वेषच शिकवला जातो. त्यांना बाबासाहेबांचे नाव कसे चालेल ? नथूरामची पुजा करणा-या पिलावळींना आंबेडकरांचे नाव कसे चालेल ? ज्यांचा आदर्श नथूराम, गोळवळकर, हेगडेवार असतो त्यांना बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचे पित्त असणारच. नेमकी हिच मळमळ देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केली. त्यांच्या मनातला विखार या निमित्ताने बाहेर आला.

अमित शहांना डॉ बाबासाहेब आंबेडकरांची अडचण असण साहजिक आहे. कारण एक ना एक दिवस बाबासाहेबांचा विचारच त्यांच्या जातीयवादी पक्षाचे आणि मातृसंस्थेचे थडगे बांधल्याशिवाय राहणार नाही. बाबासाहेबांचा विचार आणि त्यानी लिहीलेले संविधान त्यांच्या मुळावर उठल्याशिवाय राहणार नाही. या धोक्याची त्यांना पुरती जाणीव आहे म्हणूनच त्यांच्या तोंडातून हे विष बाहेर पडलं. अमित शहा म्हणतात की, "इतक्या वेळा देवाचे नाव घेतले तर देव प्रसन्न होईल आणि स्वर्गात जागा देईल !" खरेतर अमित शहांचा देव आणि त्यांचा स्वर्ग त्यांनाच लखलाभ. या निमित्तानं अमित शहाना सांगावे वाटते की, या देशात हजारो वर्षे गुलामीत खितपत पडलेल्या करोडो लोकांना माणसात आणलं, माणूस म्हणून जगायची संधी दिली ती डॉ बाबासाहेब आंबेडकरांनीच. हजारो वर्षे ज्यांना माणूसच समजलं जात नव्हतं, ज्यांचा स्पर्शसुध्दा विटाळ मानला जात होता, ज्यांची सावलीसुध्दा वाईट मानली जात होती, ज्यांच्या गळ्यात गाडगं आणि पाठीला काट्याची फांजर बांधली जात होती. कुत्री-मांजरं सन्मानाने घरात घेतली जात होती पण ही माणसं जवळपास आली तर गुरापेक्षा भयंकर मारलं जात होतं अशा लोकांना डॉ बाबासाहेब आंबेडकरांनीच माणसात आणलं. त्यांना माणूस म्हणून सन्मानानं जगण्याची संधी आंबेडकरांनीच दिली. जात उतरंडीतल्या प्रत्येक शुद्र जातीला माणूस म्हणून ताठ कण्याने जगण्याची संधी बाबासाहेबांनीच दिली. या देशात तेव्हाही देव होते,



देवांचे विविध अवतार होते, या देवांची मंदिरं होती. तेहत्तीस कोटी देवांचे अवतार होते पण यातला एकही देव या करोडो लोकांची गुलामी, दुःख-दैन्य पाहून जागा झाला नाही. त्याचं काळीज पिळवटून निघाले नाही. या लोकांच्यावर केला जात असलेला अत्यंत क्रुर पध्दतीचा अमानूष अत्याचार पाहून यातल्या एकाही देवाचे काळीज पेटले नाही, द्रवले नाही. त्याला या लोकांचे होणारे शोषण पाहून चिड आली नाही. यातल्या कुठल्याही देवाने या गुलामीत खितपत पडलेल्या लोकांसाठी कधी शस्त्र हाती घेतले नाही. कुणी परशू उचलली नाही, कुणी तलवार उपसली नाही, कुणी सुदर्शन चालवले नाही, कुणी धनुष्य उचलले नाही की कुणी आपल्या शापाने, मंत्राने अत्याचा-यांना भस्मसात केले नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर जन्माला आले, शिकले, मोठे झाले आणि त्यांनीच या करोडो लोकांसाठी संघर्ष केला. या लोकाना माणसात आणण्यासाठी त्यांनीच आपले जीवन समर्पित केले. तमाम स्त्री वर्गासह या देशातल्या सर्वच



शुद्रांना बाबासाहेब आंबेडकरांनीच मुक्त केले. अमित शहांच्या भटी व्यवस्थेने ज्या लोकांच्या प्रत्यक्ष जीवनाचा नरक केला होता त्या लोकांच्या जीवनात पृथ्वीवरतीच आंबेडकरांनी स्वर्ग निर्माण केला. त्यामुळे अमित शहांना ठणकावून सांगावे वाटते की, "बेट्या, याच आंबेडकरांनी आम्हाला माणसात आणलं तुझ्या देवाने नव्हे !"

खरेतर अमित शहा अशी गरळ ओकतायत याचा अर्थ वेगळा असू शकतो. ते हे वाक्य सहजासहजी बोललेले नाहीत. ही लिटमस टेस्ट असावी. कदाचित त्यांचा या मागे काहीतर छुपा अजेंडा किंवा कारस्थान असण्याची शक्यता आहे. आजवर मुस्लिमांना टार्गेट करत राजकारण केले गेले. येणा-या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांना टार्गेट केले जाईल, बौध्दांना टार्गेट केले जाईल असे वाटते आहे. खरेतर लोकशाही माणणा-या सर्वांनाच ते टार्गेट करत आहेत. पण विशेष करून बाबासाहेब आंबेडकरांचे जे नाव घेतात, त्यांच्या विचारांचे जे पाईक आहेत अशा लोकांना भविष्यात जास्त टार्गेट केले जाण्याची शक्यता अधिक वाटते आहे. कारण त्यांच्या धर्माधिष्टीत राजकारणाला सुरूंग लावण्याची ताकद फक्त महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातच आहे. बाबासाहेबांनी महात्मा फुलेंच्या विचारांची वाट पकडत ती अधिक प्रशस्त केली. ती वाट लोकशाहीच्या माध्यातून करोडो लोकांच्या झोपडीपर्यंत नेली. हि "वाट" च एके दिवशी या जातीयवादी सत्तेची 'वाट' लावल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच अमित शहा आणि त्यांच्या कारस्थानी संघाला बाबासाहेबांचे प्रचंड पित्त आहे. त्यांचे नावसुध्दा घेतलेले आवडत नाही. नेमकी याच पित्ताची गरळ अमित शहांनी परवा ओकली. त्यानंतर त्यांनी कांगावा करत काँग्रेसच्या विरोधात देशभर आंदोलनही केले. अमित शहांनी व त्यांच्या कारस्थानी टिमने कितीही बुड आपटले तरी त्यांचे मनसुबे यशस्वी होणार नाहीत. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा विचारच त्यांच्या हिटलरशाही व जातीयवादी सत्तेचे थडगे बांधल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे अमित शहांनी सत्ता सोडून स्वगार्चे बुकींग करण्यासाठी रोज त्यांच्या इष्ट देवतेचे नामस्मरण करायला हरकत नाही. एखाद्या गुहेत जाऊन डोळे मिटत प्रार्थना करत बसावं. आपल्या भूलोकीच्या कारनाम्यांनी स्वर्गात जागा मिळाली नाही, स्वर्गातला प्लॅट हाती लागला नाही तर किमान नरकातला तरी एखादा प्लॅट मिळतोय का ? याची चाचपणी करावी. कारण त्यांच्या इथल्या भानगडी पाहता स्वर्गातली जागा मिळणे शक्य वाटत नाही. तेव्हा बघा देवाकडे वशिला लावून. बाकी जे सतत आंबेडकरांचे नाव घेतायत त्यांच्यासाठी दुस-या कुठल्या स्वगार्ची गरज नाही. त्यांचा स्वर्ग इथच आहे. आंबेडकर त्यांच्यासाठी देवापेक्षा मोठे आहेत. त्यामुळे त्यांची चिंता अमित शहांनी करू नये. सत्तेच्या माध्यमातून केलेल्या आपल्या पापांचे क्षालन करण्यासाठीच त्यांनी सतत देवाचे नाव घेत बसावे ही विनंती.

## सर्व शासकीय विभागांनी आपले सरकार पोर्टल वरील तक्रारींचा वेळेत निपटारा करावा -जिल्हाधिकारी आशीर्वाद

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात 19 ते 24 डिसेंबर 2024 या कालावधीत सुशासन सप्ताह साजरा केला जात आहे, याच अनुषंगाने सर्व शासकीय विभागांनी व त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयांनी त्यांच्याकडे येणाऱ्या नागरिकांच्या तक्रारी तसेच आपले पोर्टल सरकारवर येणाऱ्या विविध तक्रारींचा त्वरित निपटारा करावा. आणि सर्व शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यापर्यंत अत्यंत गतिमान पद्धतीने पोहोचवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

देशाचे माजी प्रधानमंत्री स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंती निमित्त 25 डिसेंबर हा सुशासन दिन म्हणून साजरा करण्यात येतो. सामान्य प्रशासन विभागाच्या सूचनेप्रमाणे 19 ते 24 डिसेंबर 2024 या कालावधीत जिल्हास्तरावर सुशासन सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त नियोजन समिती सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय सुशासन कार्यशाळेत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, एडवोकेट जगदीश धायतिडक, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व जिल्हास्तरीय अधिकारी तहसीलदार उपस्थित होते.



जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, शासनाने सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयात न येता त्यांच्या तक्रारी त्यांना योग्य पद्धतीने करता येतील व त्याचा वेळेत निपटारा होऊन त्यांना समाधान मिळेल व गतिमान पद्धतीने शासनाचे काम होईल याकरता आपले सरकार पोर्टल सुरू करण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रशासनातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी यांनी आपले सरकार पोर्टलवर आलेल्या सर्व प्रकारच्या तक्रारींची अत्यंत गांभीर्यपूर्वक दखल घेऊन त्याचा वेळेपूर्वी निपटारा करून सर्वसामान्यांना न्याय मिळवून द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

त्याप्रमाणेच प्रत्येक तहसील कार्यालयामार्फत एक क्यूआर (QR) कोड तयार करावा. व हा कोड त्या तहसील कार्यालयातील प्रत्येक गावापर्यंत व नागरिकांपर्यंत पोहोचल याची काळजी घ्यावी. हा क्यू आर कोड स्कॅन करून त्या तहसील कार्यालय व तालुकास्तरीय यंत्रणाबाबत नागरिकांच्या ज्या काही तक्रारी असतील त्या तक्रारी नागरिकांमार्फत केल्या जातील व त्याचा निपटारा तालुकास्तरीय प्रशासकीय यंत्रणेने त्वरित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकापर्यंत शासकीय योजनेचा लाभ मिळत आहे की नाही याबाबत खात्री करण्यासाठी एका एजन्सी मार्फत दररोज (पान 2 वर..)

## सोलापूरचा दूध संघ वाचविण्यासाठी एनडीडीबीचा पुढाकार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मोठ्या आर्थिक अडचणीत असलेला राज्याचा शिखर संघ वाचविण्यासाठी जबाबदारी स्वीकारलेल्या एनडीडीबीकडे (नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड) सोलापूर जिल्हा सहकारी दूध संघ सोपविण्याची मागणी होत असताना केवळ एनडीडीबीचे मार्गदर्शन घेण्याचा निर्णय सोलापूर दूध संघाने घेतला आहे.

एनडीडीबीच्या महाराष्ट्र विभागीय अधिकारी स्वाती श्रीवास्तव या सोलापूर जिल्हा दूध संघाला आता मार्गदर्शक संचालक म्हणून काम पाहणार आहेत. अगोदरच सोलापूर दूध संघ आर्थिक अडचणीत असल्यानेच प्रशासकीय मंडळ नेमण्यात आले होते.

प्रशासकीय मंडळाची मुदत पूर्ण होत असतानाच संचालक मंडळ निवडणूक घेण्यात आली.



येत्या ८ मार्च २०२५ रोजी चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडीला तीन वर्षे पूर्ण होतात. तीन वर्षांत दूध संघ आणखीच आर्थिक गर्तेत सापडला असल्याचे दिसत आहे. अतिशय काटकसरीने पारदर्शक कारभार व एनडीडीबीसारख्या संस्थेकडे वर्ग करणे अपेक्षित आहे. मात्र, सोलापूर जिल्हा सहकारी दूध संघाकडून दूध संघ वाचविण्यासाठी प्रयत्न होताना दिसत नाही.

एक-एक करीत सर्व उत्पादने बंद झाली आहेत. सध्या पॅकिंग पिशवी विक्री इतकेही दूध संकलन होत नसल्याचे दिसत आहे. राज्याचा शिखर दूध संघ महानंदही आर्थिक गर्तेत असल्याने एनडीडीबीकडे वर्ग केला आहे.

एनडीडीबीने महानंदच्या कर्मचाऱ्यांना स्वेच्छानिवृत्ती देत स्वतःच्या कर्मचाऱ्यांवर कामकाज सुरू ठेवले आहे. सोलापूर जिल्हा सहकारी दूध संघानेही महानंदप्रमाणे निर्णय घ्यायला हवा. मात्र, जिल्हा संघाला मार्गदर्शन करण्यासाठी स्वाती श्रीवास्तव यांना ठराव करून घेतले आहे.

दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे, व्हाईस चेअरमन दीपक माळी, कार्यकारी संचालक सुजित पाटील यांना संपर्क केला असता त्यांनी फोन घेतला नाही. मात्र, संचालक दीपक वाडदेकर यांनी सोलापूर जिल्हा दूध संघ एनडीडीबीला जोडण्याची आमचीही मागणी असून चेअरमन साहेबांशी बोलून सांगतो असे सांगितले. (पान 2 वर..)

## जो पर्यंत अमित शहा राजीनामा देत नाही तो पर्यंत काँग्रेस पक्ष आंदोलन सुरू ठेवणार - खा. प्रणिती शिंदे

### खा. प्रणिती शिंदे यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ सन्मान मोर्चा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यसभेत अमित शहा यांनी त्यांच्या भाषणात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी अपमानजनक वक्तव्य केल्याबद्दल त्यांचा जाहीर निषेध करण्यासाठी, अमित शहांनी माफी मागावी, त्यांना मंत्रीमंडळातून काढून टाकावी या मागणीसाठी, सोलापूर शहर काँग्रेसच्या वतीने खासदार प्रणिती ताई शिंदे, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, शहर अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ "डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन्मान मोर्चा" डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा पासून नवीन जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत काढण्यात आली. यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांना निवेदन देऊन अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. यावेळी अमित शहा विरोधात जोरजोरात घोषणाबाजी करण्यात आली.



यावेळी बोलताना खासदार प्रणितीताई शिंदे म्हणाल्या की, राज्यसभेत गृहमंत्री अमित शहा यांनी संविधान निमार्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अपमान केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समता, समानता आणि न्यायाचा आदर्श पाळण्याचा सल्ला भाजपला आवडला नाही, इतकेच नव्हे तर, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान करून संघ व भाजपचा मनुवादी मानसिकता उघड केली. अमित शहा असे म्हणाले कि, आता फॅशन झाली आहे आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर यांच्या नावा ऐवजी देवाचे एवढे नाव घेतले असते तर सात जन्म स्वर्गात गेला असता. पण आम्हाला भाजपचा स्वर्ग नको देशातील जनतेच्या ताकदीवर स्वर्ग निर्माण करू. भाजपच्या आरक्षण संपवण्याच्या कटाचा भाग म्हणून संविधान बदलण्याचा भाजपचा प्रयत्न २०२४ च्या निवडणुकीत जनतेने हाणून पाडला आणि कुबड्या घेतलेले सरकार स्थापन करण्यास भाग पाडून लोकशाही मूल्यांचा धडा शिकवला. मात्र हा राग आता राज्यघटनेच्या निर्मात्यावर भाजप काढत असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करण्यात आला आहे. पण खेदाची बाब म्हणजे अमित शहांना यांना धडा शिकवण्याऐवजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण करत आहेत. काँग्रेस पक्षाने पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे अमित शहांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे, मात्र मोदी सरकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान करणे गुन्हा मानायला तयार नाही. भाजपने संसदेचे कामकाज रोखले. एवढेच नाही तर आपल्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या काँग्रेस खासदारांना मारहाण करून पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना खाली पाडण्यात आले. भाजपने षड्यंत्राचा एक भाग म्हणून विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात गंभीर कलमांखाली एफआयआर दाखल केला आहे. भाजप आणि त्यांची मूळ संघटना नेहमीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानविरोधी राहिली आहे. त्यांनी तिरंगा आणि संविधान बनविल्यापासूनच विरोध केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान केल्याप्रकरणी अमित शहा यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर काँग्रेस पक्ष ठाम आहे. जोपर्यंत अमित शहा राजीनामा देत नाहीत तोपर्यंत आम्ही आंदोलन सुरूच ठेवणार आहोत.

या सन्मान मोर्चात खासदार प्रणितीताई शिंदे, शहर अध्यक्ष चेतन भाऊ नरोटे, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, प्रदेश सरचिटणीस संजय हे, सुशीला आबुटे, मा. नगरसेवक प्रवीण निकाळजे, रियाज हुंडेकरी, आरिफ शेख, विनोद भोसले, श्रीदेवी फुलारे, आशाताई म्हेत्रे, मधुकर आठवले, दत्तू बंदपट्टे, मनोज यलगुलवार, अशफाक बळूरगी, सुदीप चाकोते, प्रमिला तुपलवंडे, गणेश डोंगरे, रॉकी बंगाळे, नजीब शेख, नागनाथ कदम, भीमाशंकर टेकाळे, केशव इंगळे, बसवराज म्हेत्रे, हणमंतू सायबोळू, विश्वनाथ साबळे, संध्याताई काळे, संघमित्रा चौधरी, हेमा चिंचोलकर, मिरा घटकांबळे, वाहिद बिजापुरे, महेश लोंढे, देविदास गायकवाड, बाबुराव म्हेत्रे, लखन गायकवाड, बंटी चंदनशिवे, (पान 2 वर..)

## आता पाचवी-आठवीत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात मिळणार नाही बढती

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** शिक्षण क्षेत्रात टीकेचा विषय ठरलेला पाचवी ते आठवीतील विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करून पुढच्या इयत्तेत प्रवेश देण्याचं धोरण केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने अखेर रद्द केलं आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नो डिटेंशन पॉलिसी संपुष्टात आणली आहे.

त्यामुळे आता पाचवी ते आठवीच्या वार्षिक परीक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुतीर्ण करण्यात येणार आहे. तसेच या विद्यार्थ्यांना दोन महिन्यांच्या आत पुन्हा परीक्षा देता येणार आहे. मात्र पुन्हा अनुतीर्ण झाल्यास या

विद्यार्थ्यांना पुढच्या इयत्तेत प्रवेश मिळणार नाही. तसेच कुठल्याही शाळेला इयत्ता आठवीपर्यंतच्या कुठल्याही विद्याथ्यार्ला शाळेतून काढून टाकता येणार नाही.

सोमवारी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नो डिटेंशन पॉलिसी संपुष्टात आणत दीर्घकाळापासून सुरू असलेली व्यवस्था बदलली आहे. या निर्णयामुळे आता पाचवी ते आठवीच्या वार्षिक परीक्षेत अनुतीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना नापास केलं जाणार आहे. मुलांमधील शिकण्याची क्षमता



सुधारणे आणि शैक्षणिक कामगिरी उंचावणे हे हा निर्णय घेण्यामागचं महत्त्वाचं उद्दिष्ट असल्याचं सरकारने सांगितलं आहे.

आता नव्या व्यवस्थेनुसार अनुतीर्ण विद्यार्थ्यांना दोन महिन्यांच्या आत पुन्हा परीक्षा देण्याची संधी मिळेल. मात्र जर त्या परीक्षेत पुन्हा नापास झाल्यास अशा विद्यार्थ्यांना पुढच्या इयत्तेत प्रवेश मिळणार नाही. मात्र इयत्ता आठवीपर्यंत कुठल्याही विद्याथ्यार्ला आठवीपर्यंत शाळेतून काढून टाकता येणार नाही, असेही सरकारने स्पष्ट केले आहे.

शिक्षण मंत्रालयाचे सचिव संजय कुमार यांनी सांगितले की, मुलांमधील शिकण्याच्या क्षमतेमध्ये होत असलेली घसरण थांबवण्यासाठी हे पाऊल आवश्यक दिसत आहे. मंत्रालयाने विशेष करून पाचवी आणि आठवीवर लक्ष केंद्रित केलं आहे. त्याचं कारण पायाभूत शिक्षणाच्या दृष्टीने हे वर्ग महत्त्वाचे मानले जातात. या नव्या धोरणामधून विद्यार्थी आणि शिक्षकांना अभ्यासाप्रति अधिक जबाबदार बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## संपादकीय

# आता कामाला लागा


भाजप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या सरकारमध्ये सहभागी झालेल्या मंत्र्यांचे खातेवाटप अखेर जाहीर झाल्यामुळे आता महायुती सरकारला कामाला लागावे लागणार आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये मोठ्या प्रमाणावर बहुमत असूनही राज्यात मत्रिमंडळ अस्तित्वात येऊन कामाला लागायला तब्बल एक महिन्याचा कालावधी लागला आहे.गेल्या महिन्यात 23 नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला होता त्याला आता महिना झाला आहे. जेव्हा जेव्हा विविध घटक पक्ष एकत्र येऊन सरकार स्थापन करतात तेव्हा अशा प्रकारचा विलंब लागतोच. पण यावेळी जरा जास्तच विलंब लागला आहे. मुळात 23 नोव्हेंबर रोजी जेव्हा महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्याचे जाहीर झाले त्यानंतर मुख्यमंत्री कोण होणार याबाबत निर्णय घेण्यासाठी काही कालावधी गेला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होणार हे ठरल्यावर माजी मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्रिपद स्वीकारणार की नाही हे ठरवण्यात काही कालावधी गेला. अखेर एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांचा शपथविधी झाल्यानंतर सरकार स्थापन झाले. पण मंत्रिमंडळाचा विस्तार करायलाही काही दिवस गेले. मंत्रिमंडळ विस्तारामध्ये 39 मंत्र्यांचा समावेश झाल्यानंतर या मंत्र्यांना प्रत्यक्ष खाते मिळायला आणखीन काही दिवसांचा कालावधी गेला. ज्या पक्षाच्या पाठीशी बहुमताचा प्रचंड रेटा आहे त्या पक्षालासुद्धा सरकार स्थापन करण्याबाबत विलंब लागला आहे ही परिस्थिती महाराष्ट्राच्या राजकारणाने प्रथमच पाहिली.

आता मंत्रिमंडळाचे खातेवाटप झाले असल्यामुळे सरकारचा गाडा हाकण्याचे सर्व मार्गही खुले झाले आहेत. अर्थात खाते वाटपावरून वाद विवाद होणार नाहीत असाही अर्थ नाही. कारण ज्या प्रकारे मंत्रिमंडळामध्ये भाजपाचा वरचष्मा आहे त्याच प्रकारे खातेवाटपामध्ये सुद्धा भाजपाने आपला वरचष्मा कायम ठेवला आहे. अर्थात, महायुतीतील सर्वात मोठा पक्ष म्हणून हे गृहीतच धरण्यात आले असले, तरी हेच करायचे होते तर एवढा विलंब का लावला याचे उत्तर मात्र मिळत नाही. देवेंद्र फडणवीस यांनी गृहखाते स्वतःकडेच ठेवले आहे, तर अर्थखाते नेहमीप्रमाणे अजित पवार यांच्याकडेच गेले आहे आणि नगर विकास व गृहनिर्माण ही खाती एकनाथ शिंदे यांच्याकडे गेली आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणातील जी प्रमुख तीन खाती मानली जातात ती तीन प्रमुख नेत्यांनी आपल्याकडेच ठेवली आहेत. मंत्रिमंडळ विस्तार करत असताना गेल्या मंडळातील काही अकार्यक्षम आणि वादग्रस्त मंत्र्यांना वगळण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याच प्रकारे ज्या मंत्र्यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे त्यांच्या खात्यामध्येही बदल करून मुख्यमंत्र्यांनी योग्य संदेश देण्याचे काम केले आहे. मुख्यमंत्र्यांनी आपले जवळचे सहकारी चंद्रशेखर बावनकुळे यांना महसूल खाते दिले आहे, तर पूर्वी हे खाते सांभाळणारे राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे त्या मानाने कमी महत्त्वाचे जलसंपदा खाते दिले आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये सातारा आणि कोल्हापूर जिल्हे 100 टक्के महायुतीच्या पाठीशी उभे राहिले असल्याने या जिल्ह्यांतील मंत्र्यांना वजनदार खाती दिली आहेत.

सार्वजनिक बांधकाम, पर्यटन, ग्रामविकास, आरोग्य, वैद्यकीय शिक्षण आणि पुनर्वसन अशी महत्त्वाची खाती सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील मंत्र्यांना मिळाल्यामुळे या प्रदेशातील महायुतीचा पाया अधिक भक्कम करण्याच्या दृष्टीने आणखी एक निर्णय घेण्यात आला आहे.गेल्या मंत्रिमंडळामध्ये एक्साइजसारखे महत्त्वाचे खाते शिवसेनेकडे होते पण यावेळी ते अजित पवार यांनी स्वतःकडे ठेवले आहे. या बदल्यात एकनाथ शिंदे यांच्याकडे गृहनिर्माण हे अतिरिक्त खाते देण्यात आले आहे. साधारणपणे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजप, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी या सर्व घटक पक्षांना मंत्रिमंडळ विस्तारामध्ये आणि खातेवाटपामध्येही योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे असे दिसते.

पण माजी मंत्री दीपक केसरकर यांनी शालेय गणवेशाबाबतच्या निर्णयावरून नाराजी व्यक्त केली आहे. मंत्र्यांची खाती बदलण्यात आली असल्याने आगामी कालावधीमध्ये काही नवीन निर्णय घेताना जुन्या मंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयाना धक्का लागणे साहजिक आहे. त्यावरून नवीन वाद विवाद निर्माण होऊ शकतात. अर्थात महायुतीच्या पाठीशी भक्कम बहुमत असल्यामुळे अशा प्रकारच्या छोट्या वाद विवादांकडे लक्ष दिले जाईल, असे नाही. पण एकीकडे मराठा आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे यांनी 25 जानेवारीपासून पुन्हा एकदा उपोषणाचा इशारा दिला आहे. त्यामुळे या महिन्याभराच्या कालावधीमध्ये नवे सरकार त्या दिशेने काही हालचाली करते का हे पाहणेही महत्त्वाचे आहे. दुसरीकडे लाडकी बहीणसारख्या योजनेमुळे सरकारी तिजोरीवर जो भार पडला आहे त्याबाबत नियोजन करून उत्पन्न वाढवण्यासाठी काही नवीन निर्णय घेतले जातात का हे पाहणेसुद्धा उत्सुकतेचे ठरणार आहे. नागपूर येथे झालेले विधानसभा विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन फक्त एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांनीच पार पाडले. आता मार्चमध्ये जेव्हा विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होईल तोपर्यंत नवे मंत्रिमंडळ स्थिरस्थावर होईल आणि सर्व मंत्र्यांना आपल्या खात्याचा अभ्यास करून पूर्ण तयारीने विधिमंडळाला सामोरे जाता येईल. सरकार स्थापनेबाबतचे सर्व सोपस्कार आता पूर्ण झाले असल्याने महाराष्ट्रातील जनतेचे डोळे आता हे नवीन सरकार कसे काम करते हे पाहण्याकडेच लागले आहेत. सरकारने जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आता गंभीरपणे कामाला लागायला हवे.

# साने गुरुजी



आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची जयंती. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमंळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## प्रबोधन

# तंटामुक्त गाव । तोंडची का बात


बादशहा तुघलक हा प्रजाहितदक्षतेच्या अतिरेकी कल्पना करणारा आणि त्या साकार करण्यासाठी धडपडणारा अतिउत्साही शासक होता. व्यावहारिकतेचा विचार त्याच्या उत्साहाच्या आड येऊच शकत नसल्यामुळे त्याचं हसं झालं. मोहम्मद तुघलकाच्या मते, दौलताबाद हा भारताचा मध्य असल्याने त्याने दिल्लीची राजधानी दौलतबादला हलवण्याचा प्रयत्न करून लाखो दिल्ली-निवासी नागरिकांना फरपटत नेऊन मृत्यूच्या खाईत लोटलं. इतिहासाने ह्या कर्तव्यदक्ष बादशहाची नोंद वेडा म्हणून केली.

तुघलकाची आठवण यावी, अशी ग्रामविकासातील तंटामुक्त गाव ही शासनपुरस्कृत योजना कानावर पडू लागली आहे. ही योजना सफल झाली तर भारतात पुन्हा एकदा सुवर्णयुगच अवतरेल, हे खरं! पण आजच्या खेड्यांमधील दूषित वातावरण ज्यांनी जवळून अनुभवलं आहे, ते खूप हसतील. भांडण-तंटे सज्जनांना नकोच असतात. पण भांडणांची संधी शोधत फिरणाऱ्या टोळ भैरवांना कुणी आणि कसं आवरायचं? ह्या गुंड - पुंडाची संख्या कमी असते, पण दहशत अधिक असते. ते मजेत जगतानाही दिसतात. पूवीर्ही आणि आजही! त्यांचा पशूवृत्तीचा नंगानाच पाहून प्राचार्य भोसले म्हणतात, 'शेळ्या-मेंढ्या, हरणं हे प्राणी सजातीयांना उपद्रव करीत नाहीत. माणसं मात्र याबाबतीत पुरेसा समंजसपणा दाखवीत नाहीत. माणसं मात्र जाती, धर्म, गट, पक्ष, संप्रदाय तयार करून आपापसातच लढत राहातात. मनुष्यत्वाशी विसंगत वर्तन करतात. दुष्टांचं समाजात राहाणं म्हणजे समाजाने केलेलं विषवल्लींचं संगोपन नव्हे काय?'

तुकोबाराय थोर समाजचिंतक होते. त्यांनी एका अभंगात दुर्जनांच्या सहवासात राहाणाऱ्या सज्जनांची दुःखं व्यक्त करताना म्हटलंय, अभक्ताचे गावी साधू म्हणजे काय ।व्याघ्रवाडा गाय सापडली। केळी आणि बोरी वसती शेजारी । संवाद कोणेपरी घडे तेथे ॥ ग्रामोद्धारासाठी गांधीजींनी संदेश दिला होता, 'खेड्याकडे चला.' हा त्यांचा आदर्शवाद होता. पण वास्तवाचं भान आणि अनुभव असलेल्या डॉ. आंबेडकरांनी मात्र आपल्या अनुयायांना शहरात राहा असाच सल्ला दिला होता. तरीही शहर असो वा खेडं, गुंड-पुंड आणि बदमाष सर्वत्र असतात! संत तुकोबा ज्या देहू गावात राहिले तिथे तरी तुकोबांचा छळ थांबला का ? उलट रामेश्वर भट, मंबाजी आणि शास्त्री- पंडितांच्या सांगण्यावरून तेथील पाटलानेही त्यांच्यावर आगपाखड केली. त्याचं 'कोपला पाटील' असं वर्णन त्रस्त तुकोबा करतात. लोहगावी त्यांच्यावर उकळलेलं पाणी टाकण्यात आलं. संतसज्जन तुकोबा म्हणतात, तुका म्हणे खळ। संता पीडिती चांडाळ/ कधी संतापाने म्हणाले, पिंडीवरी विंचू आला। देवपूजा नावडे त्याला॥ तेथे पैजारेचे काम। अधमासी तो अधम ।पण सरळमार्गी तुकोबांनी सारा छळ मुकाट्याने सोसला.

गावं तंटामुक्त होतील. पण त्यासाठी जातीसंस्थेचा नाश केला पाहिजे. अज्ञान, दारिद्र्य दूर केलं पाहिजे. देव-धर्म वेशीबाहेर ठेवले पाहिजेत. दारू-जुगार यांचा संसर्ग टाळला पाहिजे. जमिनी- घरं यांचं समान, न्याय्य वाटप झालं पाहिजे. हुंडाबंदी झाली पाहिजे. सामुदायिक शेती, एक गाव एक पाणवठा हे अंमलात आलं पाहिजे. व्यसनी, आळशी, चोर, बलात्कारी आणि खुनी यांना हाकलून गावात प्रवेशबंदी केली पाहिजे. वसतिगृहयुक्त शाळा-कॉलेजं सुरू झाली पाहिजेत. बुद्ध जयंती, शिवजयंती, गांधी-फुले-शाहू-आंबेडकर जयंती सर्वांनी एकोप्याने, उत्साहाने साजरी केली पाहिजे. लोकांची डोकी फिरवणारे जुने पारंपरिक सण- वार- उत्सव टाळले, तर तंटामुक्त गाव निर्माण व्हायला कितीसा वेळ लागेल? तेव्हा-

तंटामुक्त गाव । तोंडची का बात
होईना क्षणात । साध्य कधी ॥१
भांडणाची मुळे। स्वार्थात, द्वेषात
करायचे शांत आहे त्यांना ॥ २
सामूहिक शेती। नशापाणी बंदी
शिकण्याची संधी उपाय हे ॥ ३
जातिभेद मोडा । हक्क सारे सोडा
गुलामीचा खोडा । नको पायी ॥४
समानता हीच । ज्यांचे ध्यानी- चित्ती
तंटामुक्त होती । तेच थोर ॥५
स्वातंत्र्याला मान। देती जे सर्वदा
तंट्याची आपदा । तेथे न ये ॥६
दया, क्षमा, शांती। गावी ज्या नांदते
तंटामुक्ती तेथे सदा राही ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# लोकमंगल कॉलेजेस मध्ये जागतिक ध्यान दिवस साजरा

**वडाळा (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कॉलेजेस वडाळा येथे दिनांक 21 डिसेंबर रोजी जागतिक ध्यान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून संस्थेचे संस्थापक माननीय आमदार सुभाष बापू देशमुख हे लाभले होते. या जागतिक ध्यान दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये जागृत करण्याकरिता प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध योग अभ्यासक प्रा. स्नेहल पेंडसे ह्या लाभल्या होत्या. कार्यक्रमाची सुरुवात सन्माननीय अध्यक्ष, प्रमुख अतिथी, संस्थेच्या सचिवा व लोकमंगल शैक्षणिक संकुलातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर जागतिक ध्यान दिवसाच्या निमित्ताने प्रास्ताविक मांडताना लोकमंगल कृषी व्यवसाय व व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे यांनी ध्यान दिवस साजरा करण्यामागची संकल्पना,



त्याचा इतिहास आणि दैनंदिन जीवनातील ध्यानाचे महत्त्व याबाबत आपले मत व्यक्त केले. कार्यक्रमास लाभलेल्या प्रमुख अतिथी प्रा. स्नेहल पेंडसे यांचा परिचय सर्व उपस्थितांना लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सागर महाजन यांनी करून दिला. प्रा. स्नेहल पेंडसे ह्या सोलापूर जिल्हा योग परिषदेच्या अध्यक्षा तसेच महाराष्ट्र योगासने खेळ असोसिएशन च्या सदस्या असून मागील तीस वर्षापासून त्या योग अभ्यासक म्हणून कार्यरत आहेत. सद्यस्थितीत त्या योग पदविका या अभ्यासक्रमा अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर येथे योग अभ्यासक म्हणून ज्ञानदानाचे व योगप्रसारकाचे काम करीत आहेत. सुप्रसिद्ध योग अभ्यासकाचा यथोचित सन्मान कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री सुभाष बापू देशमुख यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देऊन करण्यात आला. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्रा. पेंडसे मॅडम यांनी विद्यार्थी दशेत आणि दैनंदिन जीवनात ध्यानाचे असलेले महत्त्व विशद केले. सत्य,अहिंसा,अपरिग्रह, ब्रह्मचर्य, ध्यान व साधना इत्यादी विविध बाबी त्यांनी विद्यार्थ्यांना अतिशय स्तुत पद्धतीने समजून सांगितल्या. भारतीय संस्कृती लाभलेला हजारो वर्षापूर्वीचा योग आणि ध्यान याचा इतिहास त्यांनी यावेळी उलगडून दाखवला. त्यानंतर सर्व सन्माननीय मान्यवर तथा उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी ध्यानाच्या प्रात्यक्षिकामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यानंतर लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांनी जागतिक ध्यान दिनानिमित्त लोकमंगल समूहात विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या पायाभरणी करता घेण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमा बाबत सर्वांना माहिती दिली. या जागतिक ध्यान दिनामध्ये सहभागी होऊन आत्मिक तसेच वैचारिक आनंद मिळाल्याची भावना विद्यार्थी मनोगता मध्ये लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी गणेश केदार आणि कु. मीनल कस्तुरे यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात आपल्या अध्यक्षीय मनोगता मध्ये श्री. सुभाष बापू देशमुख यांनी विद्यार्थ्यांनी तरुण वयात मानसिकरित्या आणि शारीरिकरित्या सुदृढ राहण्यासाठी योग अभ्यास, ध्यानधारणा इत्यादींचा अवलंब दैनंदिन दिनचर्येत करावा असा मौलिक सल्ला दिला. शरीर हीच खरी संपत्ती असून ती जपण्यासाठी सर्वोत्परी ध्यानाचा अवलंब करून आत्मिक समाधान व शांतता प्राप्त करावी ही सदिच्छा देखील व्यक्त केली. प्रा. पेंडसे मॅडम यांनी या योग क्षेत्रात केलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल आणि आजच्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून लाभल्याबद्दल लोकमंगल समूहाच्या वतीने त्यांनी त्यांचे आभार देखील व्यक्त केले आणि भविष्याच्या दृष्टिकोनातून लोकमंगल शैक्षणिक समूह योग अभ्यास ध्यानधारणा याबाबत नक्कीच पुढाकार घेईल असा आशावाद व्यक्त केला. कार्यक्रमाचा शेवट हा लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना एककाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. सदरील जागतिक ध्यान दिवस साजरा करण्यासाठी संस्थेच्या सचिवा डॉ. अनिता ढोबळे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयाच्या प्राध्यापिका प्रा. कविता संभारम यांनी केले. हा दिवस यशस्वीरित्या संपन्न करण्यासाठी लोकमंगल शैक्षणिक संकुलातील सर्व प्राचार्य, प्राध्यापक वृंद, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे अतुलनीय सहकार्य लाभले.

पान १ वरून

## सर्व शासकीय विभागांनी आपले सरकार...

किमान 1 ते 2 हजार नागरिकांना फोन कॉल करण्यात येतील व त्यांना मिळणाऱ्या योजनेविषयी माहिती घेतली जाणार आहे, असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांनी सुशासनाचे महत्त्व सांगून प्रत्येक अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयात आलेल्या तक्रारींच्या वेळेत निपटारा होण्याबाबत दक्षता घेण्याची सूचना केली. तसेच आजच्या जिल्हास्तरीय सुशासन सत्ता कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक एडवोकेट धायतिडक यांनी महसूल प्रशासनातील दिवाणी व महसुली कायद्याचे महत्त्व सांगून त्या कायद्याच्या अनुषंगाने कशा पद्धतीने कोणत्या कलमाखाली कार्यवाही करावयाची याची अत्यंत बारकाईने माहिती दिली.

यावेळी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 मध्ये उत्कृष्ट काम केलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी यांना प्रातिनिधिक स्वरूपात जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या हस्ते सन्मानपत्र वितरित करण्यात आले. प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी सुशासन सप्ताह निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाची माहिती दिली तसेच आजच्या कार्यक्रमाचे महत्त्व सांगितले. तर या कार्यक्रमास उपस्थित सर्वांचे आभार तहसीलदार श्रीकांत पाटील यांनी मानले.

## जो पर्यंत अमित शहा राजीनामा...

भोजराज पवार, अशोक कलशेट्टी, रवी आंबेवाले, अनिल मस्के, सिद्धाराम चाकोते, तिरूपती परकीपंडला, हारून शेख, सुमन जाधव, करीमुनिःसा बागवान, निशा मरोड, दिनेश म्हेत्रे, श्रिशैल रणधीरे, रमेश हसापुरे, संतोष सोनवणे, गिरिधर थोरात, विवेक कन्ना, रुपेश गायकवाड, राजेश झंपले, शोभा बोबे, सोहेल पठाण, शिवशंकर अंजनाळकर, संजय गायकवाड, विवेक इंगळे, सुभाष वाघमारे, धीरज खंदारे, महेंद्र शिंदे, रमेश कोळी, एजाज बागवान, धोंडप्पा तोरनगी, सोहेश पठाण, नागनाथ शावणे, व्यंकटेश बोम्मेन, अशफाक बेलीफ, सुनील सारंगी, ज्योती गायकवाड, सुरेखा साबळे, मल्लेश सुर्यवंशी, आकाश कांबळे, सुधाकर शिवशक्ती, रुपेश साबळे, अंमित लोंढे, मयूर तळभंडारे, माया कांबळे, छाया हिरवटे, अभिषेक पाटोळे, निखिल पवार, सोहेब कडेचुर, मुमताज शेख, पूजा चव्हाण, रुकैय्या बिराजदार, सुनंदा वटकर, विजयालक्ष्मी झाकने, अनिता भालेराव, मुमताज शेख, सुनिता व्होटकर, नागेश नाईक, योगेश रणधीरे, जबार शेख, सोहेल डंके, सादिक बागवान, अन्वर फनिबंद, इलियास डंके, जैनु शेख, चंद्रकांत नाईक यांच्यासह इतर पदाधिकारी नागरिक बंधु भगिनी उपस्थित होते.

## सोलापूरचा दूध संघ वाचविण्यासाठी...

**समस्या घेणार जाणून**

याबाबत एनडीडीबीच्या महाराष्ट्र विभागीय अधिकारी स्वाती श्रीवास्तव यांना विचारले असता सोलापूर संघाची अद्याप माहिती घेतली नाही. त्यांच्या काय समस्या आहेत ते जाणून घेतले जाईल, असे सांगितले. संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक ठोस भूमिका आर्थिक तोटा व कर्जाचा बोजा वरचेवर वाढत असलेल्या सोलापूर जिल्हा सहकारी दूध संघाला कोण वाचविणार?, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# आ. सरोजनी अहिरे व आ. इद्रिस नाईकवाडी यांचे सोलापुरात राष्ट्रवादीच्या वतीने स्वागत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोमवारी आमदार सरोजनी अहिरे व आमदार इद्रिस नाईकवाडी हे काही कामानिमित्त सोलापूर दौऱ्यावर आले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे शहर - जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार यांच्या पार्क चौक येथील संपर्क कार्यालयास अहिरे व नाईकवाडी यांनी भेट दिली यावेळी .शहर - जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार,कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान व इतर पदाधिकाऱ्यांसह पुष्पगुच्छ देऊन दोघांचेही सोलापुरात स्वागत केले . व पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी या भेटी दरम्यान आमदार अहिरे व नाईकवाडी यांनी सोलापूरच्या अनेक विषयांवर शहर - जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार यांच्यासमवेत विशेष असा संवाद साधला. यावेळी ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी ,माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, उद्यकिर्ती अर्बन बँक मोडनिंब चे चेअरमन उदय दादा माने , जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, महेश निकंबे, सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव, शहर उपाध्यक्ष सुजित अवघडे ,युवक अध्यक्ष सुहास कदम,कार्याध्यक्ष तुषार जक्का, युवक प्रदेश सरचिटणीस महेश कुलकर्णी, युवक समनव्यक दत्ता बडगंची, अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष अमीर शेख, दक्षिण विधानसभा अध्यक्ष अशपाक शेख ,वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख बसवराज कोळी, दिव्यांग विभाग अध्यक्ष एम. एम. इटकळे, कामगार आघाडी अध्यक्ष मार्तंड शिंगारे , श्यामराव गांगर्डे, सोशल मीडिया विभाग शहराध्यक्ष वैभव गंगणे , कार्याध्यक्ष सोमनाथ शिंदे, मोईज मुल्ला, यांच्यासह पक्षातील ईतर सर्वच प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वात्रटिका

### मंत्र्यांची परीक्षा

कोणी म्हणतो सरकार
तीन चाकी रिक्षा आहे...
मंत्री म्हणतात आता
तीन महिन्याला परीक्षा आहे...
टिकवायचे असेल पद तर
काम दाखवावे लागेल...
मंत्र्यांनी मंत्री नाही तर
सेवक म्हणून वागावे लागेल...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सोन्याच्या चोरीच्या मोहातून शेतमालकाचा खून करून घरामागील शोष खड्ड्यात पुरले

## ◆ अपहरणाचा बनाव करून खून करणाऱ्या शेतगड्यास मोहोळ पोलिसांनी केले जेरबंद

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ पोलीस ठाण्यात हरवल्याबाबतची तक्रार दाखल झाल्यानंतर मोहोळ पोलिसांनी गांभीर्याने केलेल्या तपासानंतर उघडकीस आलेल्या गंभीर गुन्ह्यांमध्ये एका शेतमालकाचा त्यांच्याच साल गड्याने अत्यंत निर्गुण पणे खूण करून त्याचे अवयव तोडून प्लास्टिक कॅरीबॅग मध्ये भरून घराच्या पाठीमागील शोष खड्ड्याच्या खड्ड्यात पुरल्याची धक्कादायक घटना मोहोळ पोलिसांनी बहात्तर तासात उघडकीस आणून यामधील आरोपीला जेरबंद केले आहे. अतिशय निर्घुण खुनाच्या या घटनेमुळे मोहोळ तालुक्यात एकच खळबळ उडाली असून या गुन्ह्यामध्ये पोलिसांनी मयताच्या बॉडीचे विविध केलेले तुकडे संकलित करताना अंगावर शहारे येत होते.

याबाबत अधिक माहिती अशी की मोहोळ पोलीस ठाणे येथे दिनांक १५.१२.२०२४ रोजी इसम नामे कृष्णा नारायण चामे वय ५२ वर्षे सध्या रा. यल्लमवाडी ता. मोहोळ हा मिसींग झाले बाबत मोहोळ पोलीस ठाणे येथे मिसींग दाखल झाली होती. सदर मिसींगच्या ०३ दिवसाच्या तपासात सर्वत्र मिसींग व्यक्तीचा विविध ठिकाणी शोध घेतला तसेच मिसींग व्यक्तीची सर्व जिल्हयातील तसेच आसपासच्या जिल्हयातील पोलीस ठाणेस तपास यादी पाठवून मिसींग व्यक्तीचे मोबाईलचा सीडीआर काढुन त्याचे अवलोकन केले परंतु सदर मिसींग व्यक्ती बाबत काही एक माहीती मिळून आली नाही.

सदर मिसींग मध्ये दिनांक १७.१२.२०२४ रोजी सदर प्रकरणाचे गांभीर्य ओळखुन नमूद मिसींग व्यक्तीबाबत अपहरणाचा गुन्हा दाखल केला. सदरच्या





अपहरणाचे तपासात अपहृत व्यक्तीचे शेतातील सालगडी सचिन भागवत गिरी यांचे कडुन माहीती मिळाली की,

अपऱ्हत इसम नामे कृष्णा चामे व त्याचे कुटूंबीयांचे बँक स्टेटमेंन्ट व इतर लोकांसोबत आर्थिक व्यवहार चा अभ्यास केला असता अप-हत व्यक्तीचे आसपासच्या १० ते १२ गावात आर्थिक व्यवहार असल्याचे दिसुन आल्याने त्या सर्व लोकांकडे सदर बाबत तपास केला परंतु त्यातुन ही गुन्हयाचे तपासयुक्त काही एक मिळून आले नाही.

अशा प्रकारे सलग पाच दिवस अपहरण व्यक्तीचा तपास करून देखील काहीही भरीव माहीती मिळाली नाही. मात्र अपहरण व्यक्तीच्या शेतात सालगडी म्हणुन राहणारा सचिन भागवत गिरी वय २५ वर्षे ता. सांगवी जि.धाराशिव यांचे चौकशीत विसंगती समोर येत होती. तेंव्हा सचिन गिरी यास संशयीत म्हणुन ताब्यात घेवून त्याचे कडे गुन्हयाचे अनुशंगाने सखोल चौकशी केली असता, सदरचा गुन्हा हा त्यांने स्वतः केल्याची कबुली दिली सदरचा गुन्हा हा त्यांने आर्थिक कारणाने व सोन्याचे लोभासाठी केल्याचे सांगितले आहे. तसेच सदर कृष्णा चामे यास त्यांने डोक्यात वारंवार हातोडा मारून प्रथम ठार मारले व त्यानंतर त्यांने धारधार हत्यारांने त्याचे शरीरांचे तुकडे तुकडे करून ते वेगवेगळया पॉलीकॅप कॅरीबॅग मध्ये भरून मयताचे शौचालयाच्या शोष खड्डयात पुरून ठेवले होते. तसेच मयताचे अंगावरील सुमारे १८ ते १९ तोळे सोने, लॉकेट, अंगठ्या व सोन्याचे कडे असे त्यांने मयताचे घरासमोरील खड्डयात पुरले असल्याचे सांगितले. तसेच सदरची हत्या त्यांने एकट्यानेच केली असल्याचे सध्या तो सांगत आहे. तरी परंतु गुन्हयाचे तपासात अधिक तपास करून आणखीन सह आरोपी आहेत अगर कसे याबाबत तपास करीत आहे. सदर आरोपी नामे सचिन भागवत गिरी वय २५ वर्षे रा. सांगवी जि.धाराशिव यास गुन्हयाचे तपासात अटक करून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरिक्षक श्री. रणजीत माने मोहोळ पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदर अटक आरोपी सचिन भागवत गिरी याचे विरूध्द धाराशिव जिल्हयातील अंबी पोलीस ठाणे येथे यापुर्वी ०३ चोरीविषयक गुन्हे असल्याचा अभिलेख मिळून आलेला आहे.

केवळ ७२ तासात या गंभीर गुन्ह्याचा छडा लावून आरोपीस जेरबंद करण्याबरोबर अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत मयताची डेड बॉडी देखील हस्तगत करण्याची कामगिरी पार पडल्याबद्दल पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम कुमार यावलकर यांनी मोहोळचे पोलीस निरीक्षक रणजीत माने, सहा.पोलीस निरीक्षक किरण पाटील, पोलीस उपनिरीक्षक कणेर्वाड, केसरकर डीबी पथकाचे दयानंद हेंबाडे व इतर सर्व सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि पोलीस उपनिरीक्षक यांच्यासह आणि डी बी टीम सह संपूर्ण पोलीस कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

सदर प्रकरणातील कृष्णा चामे याचे घर हे शेतामध्ये फॉरेस्ट ला लागुन आहे. सदर घराच्या आसपास साधारणता ०५ ते ०६ किलो मिटर अंतरापर्यंत शेती व फॉरेस्टची जमीन आहे. त्यामुळे सदर ठिकाणी राहती लोकवस्ती अगर सीसीटीव्ही सारखी तांत्रीक मदत मिळत नव्हती. तरी देखील घटनेच्या ०५ ते ०६ किलो मिटर क्षेत्राचे बाहेरील रोडवर जावुन सीसीटीव्ही चेक करण्यात आलेली होती. परंतु उपयुक्त माहीती मिळत नव्हती. अपहृत व्यक्ती कृष्णा चामे यांचा मोबाईल देखील घरीच मिळून आलेला होता. त्याचा सीडीआर काढुन सर्व संशयीत व्यक्तीचा अभ्यास केला असता गुन्हयाचे तपास उपयुक्त माहीती मिळुन येत नव्हती तरीही कौशल्यपूर्ण तपास करत आमच्या मोहोळ पोलीस ठाण्याच्या टीमने या गंभीर गुन्ह्याची उकल केली.

**- रणजीत माने**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
मोहोळ पोलीस ठाणे

# प्रताप क्रीडा मंडळाच्या राज्यस्तरीय समूह नृत्य स्पर्धेला प्रारंभ

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** कला, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात लौकिक प्राप्त केलेल्या शंकरनगर येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने दि. 22 ते 24 डिसेंबर 2024 या कालावधीत आयोजित केलेल्या शालेय मुला-मुलींच्या राज्यस्तरीय समुहनृत्य स्पर्धेला दिमाखात प्रारंभ झाला.

स्मृतिभवन शंकरनगर येथे आयोजित केलेल्या स्पधेर्चे उद्घाटन सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या प्रतिमेचे व नटराजाच्या प्रतिमेचे पूजन बालकलाकारांच्या व मान्यवरांच्या शुभहस्ते करून झाले. मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्षा कु.स्वरूपाराणी मोहिते पाटील, ॲड. नितीनराव खराडे पाटील, दीपकराव खराडे पाटील, सुमित्रा पतसंस्थेचे चेअरमन महादेवराव अंधारे, उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील, सचिव बिभिषन जाधव, परीक्षक आशिष देसाई, कुणाल मसाले, सागर राऊत प्रमुख उपस्थित होते.

प्रताप क्रीडा मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील, चि. सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या



दि. 23 रोजी सकाळ सत्रात गट तिसरा इयत्ता 8 वी ते 10 वी ग्रामीण (बॉलीवूड डान्स), व दुपार सत्रात गट 8 वी ते 10 वी कॅसेट गीत शहरी (पाश्चिमात्य), दिनांक 24 रोजी दुपार सत्रात गट चौथा इयत्ता 5 वी ते 10 वी कॅसेट गीत (प्रासंगिक नृत्य संवाद थीम डान्स), व सकाळ सत्रात गट पाचवा इयत्ता 11वी ते सर्व महाविद्यालयीन गट (प्रासंगिक नृत्य थीम डान्स) या गटांचे सादरीकरण होणार आहे.

नेतृत्वाखाली या स्पर्धा संपन्न होत आहेत. या स्पर्धेसाठी एकूण पाच गट असून स्पर्धेच्या पहिल्या दिवशी रोजी सकाळ सत्रात गट पहिला इयत्ता 1 ते 4 थी (कॅसेट गीत) मध्ये ग्रामीण गटात 9 गिते सादर झाली.

या गटात प्रथम क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेवाडी, द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाडी नंबर 2, तृतीय क्रमांक लोकविकास मराठी मिडीयम स्कूल वेळापूर. चौथा क्रमांक श्रीराम इंग्लिश मीडियम स्कूल जांभूड यांनी मिळवले, तर शहरी गटात 8 गिते सादर झाली. या गटात प्रथम क्रमांक महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला प्राथमिक विभाग शंकरनगर, द्वितीय क्रमांक श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्राथमिक विभाग कोथरूड, तृतीय क्रमांक जयसिंह मोहिते पाटील विद्यालय संग्रामनगर. यांनी पटकावला.सर्व विजेत्या संघांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र मान्यवरांच्या शुभहस्ते देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. विश्वनाथ आवड, पोपटराव पवार, डॉ.आर. आर पाटील, किरण सूर्यवंशी यांनी केले.

स्पर्धा प्रमुख मुख्याध्यापक संजय गळीतकर, दिलीप शिर्के, नामदेव काळे प्रमुख उपस्थित होते.

दुपार सत्रात गट दुसरा इयत्ता 5 वी ते 7 वी ग्रामीण व शहरी कॅसेट गीत (पारंपारिक लोकनृत्य) सादर झाले.

# अवैध वाळू वाहतुकीवर महसूल प्रशासनाची कारवाई

## दोन टिपर व एक पिक अप जीप जप्त



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. तालुक्यात महसूल विभागाच्या भरारी पथकाव्दारे गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील भीमा नदीपात्रात अवैध वाळू उत्खनन व वाहतुक करण्यासाठी वापरण्यात येणारे दोन टिपर व एक पिक अप जीप अशी 3 वाहने जप्त करण्यात आली असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इतापे व तहसिलदार सचिन लंगुटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. दि. 19 डिसेंबर 2024 रोजी गोपाळपूर येथील भीमा नदी पात्रात अवैध वाळू वाहतुक करण्यासाठी वापरण्यात येणारे दोन टिपर व एक पिक अप जीप अशी 3 वाहने जप्त करण्यात आली असून, सदर वाहने शासकीय धान्य गोदाम पंढरपूर येथे लावण्यात आली आहेत.

या भरारी पथकात मंडळ अधिकारी विजय शिवशरण, राजेंद्र वाघमारे, पंकज राठोड, ग्राम महसूल अधिकारी साईनाथ अडगडाळे, पियुष भोसले, प्रमोद खंडागळे, महेश सावंत, गणेश पिसे, संजय खंडागळे, समीर पटेल, मंगेश बनसोडे, रविकिरण लोखंडे, पी. पी. कोईगडे,आर बी खंदारे व पंढरपूर तालुका ग्रामीण पोलीस स्टेशनचे अधिकारी सहभागी होते.

# श्रध्दा संकुल मध्ये आय.टी.एस आणि अबॅकस कार्यशाळेचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आजच्या स्पर्धात्मक युगात आपला पाल्य आत्मविश्वासपूर्वक, सकारात्मक मनस्थितीत अभ्यास करून यशस्वी व्हावा. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी, स्पर्धा परीक्षेचे ज्ञान त्यांना आता पासून मिळावे व त्यांच्यातील स्पर्धा परीक्षेची भिती कमी व्हावी आणि विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढावा त्यासाठी ज्यांनी स्पर्धा परीक्षा देऊन उच्च पदावरती झेप मिळवली आहे. अशा निष्णांत मार्गदर्शकाच्या उपस्थितीत ही कार्यशाळा पार पडली या कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदी संस्थापक सचिव सुनील झाडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक तज्ञ रविंद्र देशमुख, अबॅकस एक्सपर्ट



सौ.वैशाली विभूते हे होते. तर विषेश मार्गदर्शक म्हणून आ. टी. एस जिल्हा प्रमुख श्री अंतरेश्वर नाईकवाडी स्पर्धा परीक्षेत निपूण असणारे सुशील आवताडे, सविता पाटोळे इ. मार्गदर्शक म्हणून या कार्यक्रमास लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता आरबळकर यांनी केले तर आभार पौर्णिमा सुरवसे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्थेचे व्यवस्थापक मिलन ढेपे, व्यवस्थापिका धरती पाटील मुख्याध्यापिका वीणा कदम मुख्याध्यापक फुलचंद साळुंखे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी यांचे मोलाचे योगदान लाभले.

# 81 वर्षाच्या आजीबाईचे चोरी गेलेले सोन्याचे डोरले नातेपुते पोलीस ठाणे यांनी केले परत

## आजीबाईचा चेहऱ्यावर फुलले हासू

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** दिनांक २१ ऑगस्ट २०२४ रोजी नातेपुते बस स्टॅन्ड येथून ८१ वर्षाच्या आजीबाई भामाबई लक्ष्मण कर्चे वय -८१ वर्ष राहणार - पिंपरी तालुका माळशिरस जिल्हा - सोलापूर ह्या नातेपुते बस स्टँड येथून दहिवडी बस मध्ये चढत असताना गर्दीचा, वयस्कर असल्याचा फायदा घेऊन त्यांचे गळ्यातील जवळपास १ तोळा वजनाचे ४०हजार रुपये किमतीचे जुने वापरते त्यांच्या गळ्यातील दोन डोरले व मनी मंगळसूत्र चोरून नेले होते त्याबाबत नातेपुते पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात होता त्या गुन्ह्याचा तपास नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजने यांचे मार्गदर्शनाखाली हेड



कॉन्स्टेबल संदेश पवार हे करत होते त्यांनी सदर गुन्ह्यात आरोपी नामे -1) राधाबाई रामदास शिंदे 2) रुक्मिणी छगन भोसले दोन्ही राहणार, अमळनेर - बीड 3) विमल कुमार लोखंडे रा, बारामती पुणे यांना अटक करून त्यांच्याकडून चोरीला गेलेला मुद्देमाल ताब्यात घेतला व मिळालेला सदर चोरीतील मुद्देमाल माळशिरस कोर्टाचे प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी श्री, यु बी पेठे यांनी मूळ फिर्यादी यांना परत देणे बाबत आदेश दिल्याने मुळ फिर्यादी यांना नातेपुते पोलीस ठाणे येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे हवालदार रवींद गायकवाड, नवनाथ माने, सोमनाथ मोहिते, राहुल वाघमोडे सह महिला पोलिस अंमलदार नेहा बोंदर, वैशाली शेंडगे यांनी आजीबाईचा सन्मान करत दोन डोरले व मनी मंगळसुत्र परत केले. त्यामुळे ८१ वर्षाच्या आजीबाईनी पोलीस व न्यायालयाचे आभार व्यक्त केले असून आमच्या जमण्यात एकमेकांवर विश्वास होता, असे बेविश्वासू लोक नव्हते, माझे जून्या आठवणीचे मंगळसुत्र माझेच मला परत मिळाल्याने त्यामुळे प्रामाणिक असणाऱ्या पोलीस प्रश्नाचे मी आभार व्यक्त करते असे उदगार आजीबाईनी काढले. डोरले व मनी मंगळसूत्र मिळाल्याने त्यांचें चेहऱ्यावर हास्य फुललेले होते.

# सिध्देश्वर कृषी प्रदर्शनातील डॉग शोला उत्स्फूर्त प्रतिसाद

## २५० हुन अधिक श्वानांचा सहभाग

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील श्री सिध्देश्वर कृषी प्रदर्शनातील डॉग शोमध्ये देशी-विदेशी २५० हून अधिक श्वान सहभागी झाले होते. या शोला सोलापुरातील श्वानप्रेमींचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला. होम मैदान येथे श्री सिध्देश्वर देवस्थानच्यावतीने तसेच कृषी विभाग आत्मा, सोलापूर व जिल्हा परिषद सोलापूर यांच्या सहयोगाने २१ ते २५ डिसेंबरदरम्यान आयोजित यंदाच्या ५४ व्या भव्य श्री सिध्देश्वर कृषी व औद्योगिक प्रदर्शनात रविवारी दुसऱ्या दिवशी डॉग शोचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी या डॉग शोचे उदघाटन पोलीस उपअधीक्षक संकेत देवळेकर व त्यांच्या पत्नी कविता देवळेकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कृषी प्रदर्शनाचे प्रमुख गुरुराज माळगे, देवस्थानचे विश्वस्त प्रभुलिंग मैंदर्गीकर, पशुपती माशाळ आर्दीची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉग शोसह फॅन्सी व फॅशन डॉग शोही घेण्यात आला. यामध्ये सहभागी होण्यासाठी श्वानमालक आपल्या श्वानासह आले होते. यातील



काहींच्या श्वानांना रंगीबेरंगी टी- शर्ट व हूडी, फ्रॉक आदी घालून छानपैकी नटविण्यात आले होते तर काही श्वानांना निसर्गतःच सौंदर्य लाभले होते. त्यामुळे हा शो पाहून आपल्या डोळ्यांचे पारणे फिटल्याची भावना सोलापूरसह विविध ठिकाणाहून आलेल्या श्वानप्रेमी नागरिकांनी व्यक्त केली.

दरम्यान, यातील विजेत्या श्वानांचा त्यांच्या मालकासह सन्मानचिन्ह व सहभाग प्रमाणपत्र देऊन संयोजकांच्यावतीने गौरव करण्यात आला. हा बक्षीस वितरण सोहळा माजी आमदार विश्वनाथ



चाकोते, कृषी प्रदर्शनाचे प्रमुख गुरूराज माळगे, श्री सिध्देश्वर देवस्थानचे विश्वस्त प्रकाश बिराजदार, रतन रिक्के तसेच सुप्रिता चाकोते, शीतल काडादी, सामाजिक कार्यकर्त्या पुष्पा गुंगे, सांगलीच्या स्मार्ट एक्स्पोचे प्रमुख सोमनाथ शेटे, संचालिका रेखा शेटे, प्रा. डॉ. संतोष मेटकरी आर्दीच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या शोचे परीक्षक म्हणून सांगलीचे महेश माने यांनी काम पाहिले. यासाठी केनाल असोसिएशन ऑफ सोलापूरचे संस्थापक अध्यक्ष महेश दळवी, आर्यन दळवी, स्वप्ना दळवी, शलवरी श्राफ, रसिका बडवे व त्यांच्या संपूर्ण टीमचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. यावेळी कार्निवल कंपनीकडून शोमध्ये सहभागी श्वानांना फूड पॅकेट मोफत देण्यात आले.

ऑल ब्रीड डॉग शोतील विजेत्यांचा गौरव यामध्ये लॅब्राडॉर, डॉबरमॅन, जर्मन शेफर्ड, बिगल, बिशान, कारवान, रॉटवेलर यासह देशी-विदेशी पंचवीस प्रकारचे अडीचशेहून अधिक श्वान या डॉग शोमध्ये सहभागी झाले होते. यातील ऑल ब्रीड डॉग शोतील प्रत्येक गटातून आठ विजेत्या

श्वानांचा त्यांच्या मालकांसह सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच लहान मुलांसाठीही बेस्ट डॉग हॅण्डलर स्पर्धा घेऊन त्यांचाही सन्मान करण्यात आला.

# विद्यार्थ्यांनी जाणून घेतला इस्त्रोचा प्रवास




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इस्त्रोने देशात अनेक अंतराळ मोहिमा यशस्वीपणे राबवून नावलौकिक मिळवला आहे. या संस्थेबद्दल सर्वसामान्यांना फारशी माहिती नसते. ही माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावी यासाठी आलेल्या इस्त्रोच्या 'स्पेस ऑन व्हिल्स' च्या माध्यमातून 'एमआयटी'तील विद्यार्थ्यांनी इस्त्रोच्या स्थापनेपासून आतापर्यंतच्या अंतराळ प्रवासाची सविस्तर माहिती जाणून घेतली.

या बसचे उदघाटन एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे प्रकल्प संचालक प्रा. प्रभा कासलीवाल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ऑपरेशन्स आणि प्रकल्प अधिकारी महेश देशपांडे, एम. आय. टी. विश्वशांती गुरुकुलचे प्राचार्य मनीष पुराणी, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य राजकुमार गायकवाड, समन्वयिका सरस्वती कांबळे आदी उपस्थित होते. या बसच्या माध्यमातून भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या मिशनची आणि आतापर्यंतच्या अंतराळ प्रवासाची माहिती देण्यात आली आहे.

यामध्ये चांद्रयान-१ मोहीम, मंगळयान मोहीम, अवकाशात सोडलेले विविध उपग्रह आणि इस्त्रोचा आतापर्यंतचा एकूण अवकाश प्रवास सविस्तर बघायला मिळणार आहे. चांद्रयान आणि मंगळयान मोहीम राबविण्यासाठी वैज्ञानिक पध्दती, मोहिमेची माहिती आणि या मोहिमेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या आव्हानांची माहिती दिली आहे. यासोबतच या वाहनात बसवण्यात आलेल्या स्क्रिनच्या माध्यमातून इस्त्रोच्या स्थापनेपासून आतापर्यंतच्या अंतराळ प्रवासाची पूर्ण माहिती देण्यात आली आहे.

आयआरएस उपग्रहाद्वारे छायाचित्रित केलेली जगातील काही शहरे येथे आहेत. ही शहरे अंतराळातून कशी दिसतात हे देखील पाहता येते. विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक कक्षा रूंदावण्यास देखील या उपक्रमाचा उपयोग होत आहे.

# रस्त्यांच्या कामासाठी केंद्रीय मंत्र्यांना साकडे

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा विधानसभा मतदारसंघाचे आ.अभिजित पाटील यांनी केंद्रीय रस्ते महामार्ग वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची नागपूर येथे भेट घेऊन मतदारसंघातील विविध रस्त्यांच्या कामावावत निवेदन देऊन संबंधित कामे मार्गी लावण्याची मागणी केली. गडकरी यांनी,केलेल्या मागण्यांबाबत सकारात्मक प्रतिसाद देत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. आ. पाटील यांनी निवडणुकीदरम्यान मतदारसंघातील रस्ते चकाचक करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार मतदारसंघातील रस्ते पूर्ण व्हावेत, यासाठी त्यांनी केंद्रीय रस्ते महामार्ग वाहतूक मंत्री गडकरी यांची भेट घेऊन माढा मतदारसंघातून जाणारा श्री संत मुक्ताई पालखी महामागार्ला राज्य महामार्ग दर्जा देऊन निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. माढा मतदारसंघातून करमाळा-टेंभुर्णी-करमाळा- टेंभुर्णी-पंढरपूर-मंगळवेढा रस्ता चौपदरी करावा. पंढरपूर (तिऱ्हेमार्ग) देगाव -सुस्ते-टाकळी सिकंदर- कुरुल रस्ता चौपदरी करावा. याचबरोबर मतदारसंघातील अनेक रस्त्यांच्या कामा बाबत निवेदन देऊन लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केली आहे. यावेळी केंद्रीय मंत्री गडकरी यांनी, केलेल्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

